# SHIKSHA CLASSES

**विषय : मराठी** **एकूण गुण : ८०**

**कक्षा : १०(CBSE)** **Pre. Question Paper - 01** **वेळ : ३ तास.**

**विभाग - 'अ'**

**प्र.१ ला : खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही पाच)** **(५)**

गुरुजींची 'श्यामची आई' म्हणजे कुमारांची जणू गीताच आहे. पण ज्याला 'साने गुरुजी' म्हणजे काय, हे समजून घ्यायचे आहे, त्याने 'श्यामची आई' पुन:पुन्हा वाचली पाहिजे, पारायणे केली पाहिजेत. प्रत्येक माताच प्रेममयी असते व आपल्या मुलांसाठी ती कोणताही त्याग करायला मागेपुढे पाहणार नाही, हे खरे; पण गुरुजींची आई एक विलक्षण स्त्रीरत्न असले पाहिजे. आभाळ फाटावे तसा त्या माउलीचा संसार फाटत चालला होता, पण ती जीवाचे रान करून तो सावरू पाहत होती. घरात खायची ददात, धड वस्त्रांची टंचाई, पोराबाळांच्या शिक्षणाला दमडा नाही, पण श्यामची आई डगमगली नाही. आपल्या मुलांच्या मनाला उदात्त सुंदर वळण लावण्यासाठी ती आमरण झिजली. साने गुरुजींच्याजवळ जे जे काही सुंदर होते, देण्यासारखे होते, ते ते तिने त्यांना दिलेले होते. मनुष्यावरच नव्हे तर गाईगुरांवर, फुलपाखरांवर, झाडामाडांवर प्रेम करायला तिने शिकवले. स्वत:च्या मुलांचे कोणीही कोडकौतुक करील. परंतु दुसऱ्याच्या मुलांचेही तितक्याच प्रेमाने करावे, हे तिने शिकवले तिच्या प्रेमाने, तिच्या रागाने, तिच्या अश्रूंनी गुरुजींचा मन:पिंड बाळसेदार झाला.

१) 'आई' या शब्दाचा समानार्थी शब्द खालील पैकी कोणता?
   अ) माता   ब) कन्या   क) ताई   ड) सखी

२) काय फाटावे तसा त्या माउलीचा संसार फाटत चालला होता?
   अ) आकाश   ब) आभाळ   क) गगन   ड) नभ

३) आपल्या मुलांच्या मनाला उदात्त ......... वळण लावण्यासाठी ती आमरण झिजली.
   अ) चांगले   ब) वाईट   क) सुंदर   ड) सुशिल

४) तिच्या ......... गुरुजींचा मन:पिंड बाळसेदार झाला.
   अ) ज्ञानाने   ब) अश्रूंनी   क) त्यागाने   ड) कर्तव्याने

५) सानेगुरूजी म्हणजे काय हे समजून घ्यायचे असेल तर काय वाचले पाहिजे?
   अ) महाभारत   ब) श्यामची आई   क) रामायण   ड) यापैकी नाही

६) मुलांसाठी त्याग करायला कुटूंबात कोण पुढे असते?
   अ) बहीण   ब) मावशी   क) माता   ड) वडील

७) 'जीवाचे रान करणे' याचा अर्थ ?
   अ) खूप काबाड कष्ट करणे   ब) आराम करणे
   क) बौद्धिक कष्ट करणे   ड) व्यायाम करणे

SHIKSHA CLASSES, BHANDARA.

**प्र. २ रा : खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.(कोणतेही पाच) (५)**

असा प्रत्येक घटक जो आपल्याला काहीतरी नवीन शिकवतो, ज्ञान देतो तो म्हणजे 'गुरू' ही माझी गुरूंची व्याख्या आहे. आईवडील, भावंडे, शिक्षक, मित्र हे सगळे आपले गुरूच आहेत. या सर्वांकडून सतत नवीन गोष्टी शिकायला मिळतात. पुस्तकं हा मोठा गुरू आहे. शाळेची पुस्तके शिक्षण तर देतातच पण कथा, कादंबऱ्या, कविता, चरित्रं या अवांतर वाचनातून भरभरून ज्ञान मिळतं. इतकं ज्ञानसमृद्ध करणारा पुस्तकांसारखा गुरू विरळाच. यासारखा आणखी एक गुरू म्हणजे प्रवास. प्रवासात नवनवीन प्रदेश, तेथील लोक, त्यांची संस्कृती, भाषा सर्व काही नव्याने समजते. गुरू आपले जीवन प्रवाही ठेवतात. अन्यथा ते डबक्यात साचलेल्या पाण्याप्रमाणे होईल. गुरू मानवी आयुष्याला प्रगतीच्या दिशेने चालना देण्यास मदत करतात, म्हणूनच आपल्या जीवनात गुरूंचे स्थान अमूल्य असते.

१) 'ज्ञान' या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द खालीलपैकी कोणता?

अ) सुज्ञ ब) अज्ञान क) हुशार ड) विद्वत्ता

२) आईवडील, भावंडे, शिक्षक व मित्र या सर्वांकडून सतत काय शिकायला मिळते?

अ) कथा ब) नवीन गोष्टी क) शैली ड) भाषा

३) ज्ञानसमृद्ध करणारा पुस्तकांसारखा ------ विरळाच.

अ) मित्र ब) सखा क) गुरू ड) जग

४) मानवी आयुष्याला प्रगतीच्या दिशेने चालना देण्यास कोण मदत करतो?

अ) लोक ब) गुरू क) संस्कृती ड) जग

५) आपल्या जीवनात कोणाचे स्थान अमूल्य आहे?

अ) मित्राचे ब) मैत्रीणीचे क) गुरूचे ड) शिष्याचे

६) गुरू आपले जीवन ------ ठेवतात.

अ) स्थिर ब) अस्थिर क) प्रवाही ड) यापैकी नाही

७) 'शिक्षक' या शब्दांचे लिंग ओळखा.

अ) स्त्रीलिंग ब) नपुसकलिंग क) पुल्लींग ड) यापैकी नाही

**प्र. ३ रा : क) सूचनेनुसार लिहा. (कोणतेही चार) (४)**

१) तो शालीन कवी मनापासून <u>हसला</u>. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) नाम ब) क्रियापद क) अव्यय ड) सर्वनाम

२) लेखकाच्या बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता. (विशेषण ओळखा)

अ) उत्साह ब) लेखक क) अवर्णनीय ड) होता

३) रवी <u>वारंवार</u> आजारी पडतो. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) क्रियापद ब) क्रियाविशेषण क) नाम ड) सर्वनाम

४) मुले मैदानावर खेळतात. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

अ) मुले ब) मैदानावर क) खेळतात ड) मैदान

५) माझे शिक्षण थांबणार असे वाटू लागले; <u>पण</u> माझ्या आईने धीर सोडला नाही
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ) क्रियाविशेषण अव्यय ब) केवलप्रयोगी अव्यय

क) उभयान्वयी अव्यय ड) शब्दयोगी अव्यय

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**प्र.३ रा : ख) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) आजोबा उद्यानात जातात. (भविष्यकाळ करा)

अ) आजोबा उद्यानात गेले. ब) आजोबा उद्यानात जातील.

क) आजोबा उदयानात गेले होते. ड) यापैकी नाही

२) पावसात मोर नाचत आहे. (काळ ओळखा)

अ) भुतकाळ ब) वर्तमानकाळ क) भविष्यकाळ ड) यापैकी नाही

३) लेखकाचे वजन कमी होईल. (काळ ओळखा)

अ) वर्तमानकाळ ब) भविष्यकाळ क) भूतकाळ ड) यापैकी नाही

४) वाघ पाण्याच्या आसपासच वावरत आहे. (भूतकाळ करा)

अ) वाघ पाण्याच्या आसपासच वावरत होता.

ब) वाघ पाण्याच्या आसपासच वावरत असेल.

क) अ व ब ड) यापैकी नाही.

**प्र.३ रा : ग) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) पण माझ्या आईने धीर सोडला नाही. (वाक्याचा प्रकार ओळखा)

अ) आज्ञार्थी ब) प्रश्नार्थी क) विधानार्थी ड) उद्गारार्थी

२) ताजमहाल खूपच सुंदर आहे. (उद्गारार्थी वाक्य करा)

अ) अरे व्वा! ताजमहाल किती सुंदर आहे.

ब) अरेरे! ताजमहाल सुंदर आहे.

क) अरे! ताजमहाल सुंदर आहे.

ड) यापैकी नाही.

३) आम्ही तुला कधीच सोडून जाणार नाही. (प्रश्नार्थक वाक्य करा)

अ) आम्ही सोडणार का? ब) आम्ही तुला कधीतरी सोडून जाणार का?

क) आम्ही तुला सोडून जाऊ ड) यापैकी नाही

४) ''इश्श! साखरेशिवाय लाडू आमच्या घराण्यात कुणी केले नाही. (विधानार्थी वाक्य तयार करा)

अ) साखरे शिवाय लाडू आमच्या घराण्यात कुणी केले नाही.

ब) साखरेनेच लाडू बनतात.

क) साखरेशिवाय लाडू बनवता येत नाही.

ड) यापैकी नाही.

**प्र.३ रा : घ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

अ) शेवट - अंत ब) शेवट - सुरूवात

क) शेवट - आरंभ ड) शेवट - प्रारंभ

२) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

अ) सरिता ब) झरा क) नदी ड) तटिनी

३) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

अ) आर्जव ब) विनंती क) विनवणी ड) तक्रार

**प्र.४ था : क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) खालीलपैकी विरूध्दार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

अ) ज्ञान × अज्ञान ब) दिवस × दिन

क) सकाळ × पहाट ड) मित्र × सखा

SHIKSHA CLASSES, BHANDARA

२) ‘प्राचीन’ या शब्दाचा विरूध्द अर्थाचा योग्य शब्द निवडा.

अ) अतिप्राचीन ब) नूतन क) जुना ड) यापैकी नाही

३) ‘अपमान’ या शब्दाचा विरूध्द अर्थाचा योग्य शब्द निवडा.

अ) सन्मान ब) प्रसिद्धी क) तिरस्कार ड) यापैकी नाही

**प्र.४ थाः ख) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा पर्याय ओळखा.

अ) कुमारी ब) सांडणी क) सिंहीण ड) कोकीळ

२) लिंगविचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.

अ) आकाश ब) झाड क) इंद्रधनुष्य ड) पक्षी

३) खालीलपैकी पुल्लिंगी शब्द कोणता ?

अ) रात्र ब) पहाट क) शेळी ड) कुत्रा

**प्र.४ थाः ग) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ?

अ) घरे ब) धावा क) वाट ड) पंखे

२) खालीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी शब्द कोणता ?

अ) वासरे ब) धागा क) ओझं ड) फळ

३) ‘वाट’ या शब्दाचे योग्य अनेकवचनी रूप कोणते ?

अ) वाटा ब) वाट्या क) वाटी ड) वाटे

**प्र.४ थाः घ)सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?

अ) बिनचूक ब) नवरात्र क) त्रिदल ड) अष्टविनायक

२) ज्या समासामध्ये दोन्ही पदे ही सारखीच महत्त्वाची असतात तेव्हा त्याला ---------- असे म्हणतात. (रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा)

अ) द्वंद्व ब) अव्ययीभाव क) द्विगू ड) तत्पुरूष

३) खालील शब्दाचा समास ओळखा.

खरेखोटे -

अ) इतरेतर द्वंद्व ब) वैकल्पिक द्वंद्व क) समाहार द्वंद्व ड) द्विगू

**प्र.५ वा : खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही पाच)** **(५)**

एकदा मी पु.ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो. तेवढ्यात सुनीताबाईनी मला थांबवले व विचारले तुम्हाला शाल दिली तर चालेल काय?

मी एका पायावर हो म्हटले. पु.ल. व सुनिताबाईनी यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योग होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रड़त होते. आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील पुलकित शाल काढली पाचपन्नास रूपयाच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

SHIKSHA CLASSES, BHANDARA

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, या शाली घेऊन घेऊन मी आता शालीन बनू लागलो आहे.

१) लेखक रा.ग. जाधव कामानिमित्त कोणाकडे गेले होते?

अ) महेंद्र कदम  ब) पु.ल. देशपांडे  क) सुप्रिया खोत  ड) नारायण सुर्वे

२) सुनीताबाईंनी लेखकांना काय देवू केले?

अ) शाल  ब) नारळ  क) भेटवस्तू  ड) फुले

३) लेखक विश्‍वकोशाचे ------ म्हणून गेले.

अ) उपाध्यक्ष  ब) अध्यक्ष  क) सचिव  ड) अधिकारी

४) परिच्छेदात आलेल्या नदीचे नाव सांगा ?

अ) गोदावरी  ब) कृष्णा  क) कावेरी  ड) गंगा

५) 'दक्षिण' या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द ओळखा.

अ) पूर्व  ब) उत्तर  क) पश्‍चिम  ड) यापैकी नाही

६) 'तुम्हाला शाल दिली तर चालेल काय?' वाक्याचा प्रकार ओळखा.

अ) उद्गारवाचक वाक्य  ब) प्रश्‍नार्थी वाक्य

क) विधानार्थी वाक्य  ड) आज्ञार्थी

**प्र.६ वा : खालील कविता वाचून प्रश्‍नांची उत्तरे लिहा. (कोणतेही पाच)** **(५)**

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;

जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;

वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझे पाऊल जिद्दीचे;

तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यातील आसवाची
ज्योत ज्योत पाजळावी

अशा असंख्य ज्योतींची
तुझ्या मागून राखण;
दीनदुबळयांचे असें
तुला एकच औक्षण.

१) कवीच्या मते, मुठीमध्ये काय नाही?

अ) जमीन  ब) द्रव्य  क) रक्त  ड) यापैकी नाही

२) 'शौर्य' या शब्दाचा अर्थ काय?

अ) पराक्रम  ब) प्रसिद्धी  क) कार्य  ड) सन्मान

३) सैनिकाचे पाऊल असे आहे.

अ) मागेचे  ब) पुढेचे  क) जिद्दीचे  ड) बाजूचे

४) डोळे भरून पाहणारे दृश्य कोणते?

अ) कार्याचे  ब) विजयाचे  क) महतीचे  ड) निसर्गाचे

५) कवीने, कवितेत कशाचे वर्णन केलेले आहे?

अ) शेतकऱ्याचे  ब) सैनिकाचे  क) व्यापाऱ्याचे  ड) डॉक्टरचे

SHIKSHA CLASSES, BHANDARA

६) काय करावे कळेना नाही ------ सामर्थ्य.

अ) कष्टाचे ब) दृष्टीचे क) विजयाचे ड) यापैकी नाही

## विभाग - ब

**प्र.७ वा : अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) कविवर्य नारायण सुर्वे यांना प्रत्येक कार्यक्रमात कोणत्या गोष्टी मिळत होत्या?

२) कोणत्या रूपात ई कॅलरी (कॅलरीज) लेखकाच्या पोटात गेल्या?

३) अब्दुलची जीवनेच्छा एकाएकी का उडून गेली?

४) नटसम्राट नाटकाचे लेखक कोण आहेत?

५) हायस्कूलचा अभ्यास करताना लेखकाला कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले?

**प्र.७ वा : आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) मावशीची परिस्थिती ............ असल्याने निरंजन वार लावून जेवायचा.

२) 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा '............' पुरस्कार मिळाला आहे.

३) 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन कारण शिक्षणाशिवाय या जगात ............ नाही.

४) लेखक वाईला विश्वकोशाचे ............ म्हणून गेले.

५) एखाद्या वस्त्राचा एकाएकी ............ उडून जावा तशी त्याची जीवनेच्छा एकाएकी उडून गेली.

**प्र.७ वा : इ) खालील प्रश्नांची उत्तरे ४० ते ५० शब्दांत लिहा. (कोणताही एक)** **(३)**

१) तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दात लिहा.

२) 'भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी द्यावे आणि हे ही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली द्याव्यात, असे लेखकाने का म्हटले असावे? तुमचे मत लिहा.

३) दोरीवरच्या उड्या मारण्याच्या प्रसंगातील तुम्हाला समजलेला विनोद स्पष्ट करा.

**प्र.८ वा : अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) 'अंकिला मी दास तुझा'' या अभंगात दास कोणाला म्हटले आहे?

२) 'दोन दिवस' कवितेतील कवीचा जवळचा मित्र कोण आहे?

३) 'औक्षण' या कवितेत सैनिकाप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी आपल्याकडे कोणत्या गोष्टी नाहीत? असे कवयित्री म्हणतात.

४) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?

५) मेघाला विनवणी करणारा कोणता पक्षी आहे?

**प्र.८ वा : आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही तीन)** **(३)**

१) भुकेले वत्सरावे ! .......... हुंबरत धांवे ॥

२) हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही .......... आले.

३) तुझी विजयाची दौड .......... भरून पहावी.

४) भाकरीचा चंद्र शोधण्यातच .......... बरबाद झाली.

५) डोळ्यातील ............ ज्योत ज्योत पाजळावी.

**प्र.८ वा : इ) खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा.** **(३)**

१) दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो

दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो

२) जीव ओवाळावा तरी

SHIKSHA CLASSES, BHANDARA

जीव किती हा लहान;

तुझ्या शौर्यगाथेपुढे

त्याची केवढीशी शान;

**प्र.८ वा : ई) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१) 'बार्क' या शब्दाचा अर्थ सांगा?

२) डॉ. अनिल काकोडकरांना कशावर काम करण्यास सांगण्यात आले?

३) भारतीय अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला?

**प्र.९ वा : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **(८)**

**१)** धान्याच्या रोपाची आत्मकथा

**मुद्दे :** वाऱ्यावर लवणारे पीक - बी पेरणी, मशागत - रोपांचे संगोपन, रोपांची लावणी - पाखरांची धाड - वारा, पाऊस यांना तोंड देणे - माणसासाठी तग धरणे.

२) वाचाल, ... तर वाचाल !

**मुद्दे :** छंद कोणकोणते? छंद कशाला हवेत? छंदाचा लाभ - वाचनछंदाची किमया - वाचनकला प्रयत्नसाध्य - वाचनाचे फायदे - कोठे कोठे उपयोगी - वाचनाचा व्यक्तिश: होणारा फायदा.

३) मंगळावर मानवी वसाहत झाली तर ...

**मुद्दे :** वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न कमी - मंगळावर जाण्यासाठी चढाओढ - पृथ्वी - मंगळ दळणवळण - मंगळावर सजीव असतील तर ? - तिथल्या पर्यावरणाशी जुळवून घेणे, प्रयत्न करणे - पर्यावरणाचे फायदे तोटे - मूलभूत गरजा भागवण्यासाठी अधिक संशोधनाची गरज - पृथ्वीपेक्षा राहणीमान वेगळे.

**प्र.१० वा : अ) खालील मुद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **(७)**

**मुद्दे :** मोरू कोळ्याचे पोर - बापाची समुद्रकिनारी वाट पाहणे - समुद्राची कृपा - उदरनिर्वाहाचे साधन - पूजा करून कृतज्ञता व्यक्त - समुद्रात हरवलेला बाप होडक्यात दिसणे - सागरची बापाशी गळाभेट

**किंवा**

एक दानशूर राजा ------- प्रजा सुखी ------ दरबारात प्रजादिन ------ एक कोळी ------ राजासाठी ताजे ताजे मासे ------ पहारेकरी अडवतो ------ भेटीसाठी लाच मागतो ------ कोळ्याचे वचन ------ अर्धा वाटा देईन ------ राजा बक्षीस ------ शंभर फटके ------ बुद्धिचातुर्याबद्दल सन्मान.

**प्र.१० वा : आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक)** **(५)**

मोहन - मोहिनी भगत, विद्यार्थी प्रतिनिधी, प्रज्ञा निकेतन बोईसर, पालघर येथून शाळेसमोरच्या नदीमध्ये जलपर्णी साठली आहे. त्यासंबंधीचे तक्रारपत्र महापालिका आयुक्त जिल्हाधिकारी यांना लिहा.

**किंवा**

रसिका / रजनी हे शारदा विद्यालय, बोरिवली या शाळेचे विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने, वन-अधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली यांना वनमहोत्सवात वृक्षारोपण करण्यासाठी रोपे पुरवण्याची मागणी करणारे पत्र लिहितो/लिहिते.

* * *

SHIKSHA CLASSES, BHANDARA


BECOME AN ACE IN JEE & NEET
SHIKSHA CLASSES
Believe & Achieve
JEE | NEET | Previse (8-10)
8625055707 | 8623085707
shikshaclasses.co.in
M-19, MHADA Colony, Khat Road, Bhandara
Learn with Jaiswal sir